महाराष्ट्र शासन

**सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई**

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला,
शासकीय तंत्रनिकेतन परिसर
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ५१

**फोन नं. ०२२-६९१६२३००**
romumbai@dtemaharashtra.gov.in
**www.jdteromumbai.org.in**

क्रमांक :- २/विकामुं/तंशि/लेखा/स्वीप्रले/२०२५/ दिनांक :-

कालमर्यादा दि.१६-०४-२०२५

प्रति,
प्राचार्य,
शासकीय तंत्र निकेतन,
मुंबई / ठाणे / पेण / मालवण /
विक्रमगड / रत्नागिरी,
शासकीय मुद्रण तंत्रसंस्था, मुंबई,
लोकनेते शामराव पेजे शासकीय
अभियांत्रिकी महाविद्यालय, रत्नागिरी,
शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, रत्नागिरी.

विषय :- स्वीय प्रपंजी लेखा (पी.एल.ए.) मधून आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये विविध बाबींवर करावयाचे खर्चाचे अंदाजपत्रक मान्यतेसाठी सादर करणेबाबत.

संदर्भ :- १) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.१०/पदविका/मा.प्र./स्वीप्रले/अंदाजपत्रक २०२५-२६/२०२५/११२, दि.०२-०४-२०२५.

२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. पीएलए-२०१५/(प्र.क्र.१६८/२०१५)/ तांशि-३, दि.०१-०१-२०१८.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यांत येते की, शासन निर्णय क्र.पीएलए-२०१५/(प्र.क्र.१६८/२०१५)/तांशि-३, दि.०१-०१-२०१८ मध्ये सर्व शासकीय संस्था / महाविद्यालये यांचेकडील स्वीय प्रपंजी लेख्यामधील (पी.एल.ए.) रक्कमेच्या विनियोजनाबाबत सर्व समावेश धोरण ठरविण्यांत आले आहे. त्यानुसार प्रत्येक संस्था / महाविद्यालय यांनी प्रत्येक वर्षी, त्या वर्षीच्या दि.३१ मार्च अखेरीस अंदाजे जमा व त्यातून पुढील आर्थिक वर्षात करावयाच्या प्रस्तावित खर्चाच्या बाबींचे अंदाजपत्रक या कार्यालयामार्फत संचालनालयास सादर करणे आवश्यक आहे.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थांच्या स्विय प्रपंजी लेख्यामधून संस्थास्तरावर हस्तांतरणीय बाबींच्या जमा निधीमधून संदर्भाधिन शासन निर्णयातील परिच्छेद क्र.४(८) मध्ये नमूद मर्यादेत करावयाच्या खर्चाचे वार्षिक अंदाजपत्रकाकरीता संस्थानिहाय / महाविद्यालयनिहाय जमा रकमेची माहिती सोबत जोडलेल्या परिशिष्ट-१, परिशिष्ट-२ व परिशिष्ट-३ तसेच खर्चाच्या अंदाजपत्रकाची माहिती **PDF Format** मध्ये तसेच **Excel Format** मध्ये **Sakal Marathi** या **Font** चा वापर करुन प्रपत्र “अ” व “ड” च्या नमुन्यात भरुन या कार्यालयास सादर करण्यात यावी. अंदाजपत्रकातील माहिती भरतांना संदर्भिय शासन निर्णयाचे काटेकोरपणे पालन करावे.

अंदाजपत्रकात नमूद खर्चाची रक्कम स्विय प्रपंजी लेख्यातील एकूण हस्तांतरणीय जमा रकमेच्या संदर्भिय शासन निर्णयातील परिच्छेद क्र.४(८) मध्ये नमूद बाबींसाठी निर्धारित करण्यांत आलेल्या वित्तीय मर्यादेतच असावी. तसेच अंदाजपत्रक सादर करतांना संपूर्ण आर्थिक वर्षातील खर्चाचे अंदाजपत्रक एकदाच सादर करुन मान्यता प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. वारंवार पीएलएमधून खर्च करण्याची परवानगी दिली जाणार नाही, असे संचालनालयाने त्यांच्या संदर्भिय पत्रामध्ये नमूद केले आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात शासन निर्णयातील बाबी अंतर्गत विहित केलेल्या वित्तीय मर्यादेपेक्षा जास्त खर्च होणार असल्यास त्याकरीता संपूर्ण खर्चाच्या रकमेचा सविस्तर स्वतंत्र प्रस्ताव नियमित खर्चाच्या अंदाजपत्रकासोबत सादर करावा. सदर प्रस्तावावर शासनाकडून मान्यता प्राप्त करुन घेण्याबाबतची कार्यवाही टप्प्या टप्प्याने करण्यात येईल, असे संचालनालयाने त्यांच्या संदर्भिय पत्रामध्ये नमूद केले आहे. तसेच विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या वित्तीय मर्यादेपेक्षा अधिकच्या खर्चाचे प्रस्तावांवर संचालनालयाकडून कार्यवाही करण्यात येणार नाही असे संचालनालयाने सुचित केले आहे. नमूद कालमर्यादेत अंदाजपत्रक प्राप्त न झाल्यास संबंधित संस्थेला आर्थिक वर्ष २०२५-२६ करीता स्विय प्रपंजी लेख्यामधून कोणताही खर्च करावयाचा नाही, असे समजण्यात येईल. अश्या संस्थांकडून आर्थिक वर्ष २०२५-२६ करीता स्विय प्रपंजी खात्यातून खर्च करण्याचे प्रस्ताव विहीत मुदतीनंतर प्राप्त झाल्यास, अशा प्रस्तावांवर कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही व असे प्रस्ताव दप्तरी दाखल करण्यात येतील, याची नोंद घेण्यात यावी.

तरी आपणांस सुचित करण्यात येते की, आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील स्विय प्रपंजी लेख्याचे अंदाजपत्रक सादर करतांना संचालनालयाच्या संदर्भिय पत्राचे अवलोकन करावे व त्या पत्रासोबत जोडलेल्या सुचनांचे पालन करावे. तसेच सदर प्रकरणी प्राधान्य क्रमाने कार्यवाही करुन स्वीय प्रपंजी लेखा (पी.एल.ए.) मधून आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये विविध बाबींवर करावयाचे खर्चाचे अंदाजपत्रक या कार्यालयास दि.१६-०४-२०२५ पुर्वी सादर करावे.

सोबत :- संचालनालयाचे पत्र, परिशिष्ट-१,
परिशिष्ट-२, परिशिष्ट-३
व प्रपत्र “अ” व “ड”

Signed by
Pramod A Naik
Date: 21-04-2025 14:31:43

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई